MHKO100005222024

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ८४/२०२४</u>**

शांताबाई पोवार वगैरे.
//वि//
भिमराव खोत वगैरे.

## <u>निशाणी क्र.११ वर आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादींतर्फे प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.१२ येथे म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादींना दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ यांना दिनांक २१/०६/२०२४ रोजी समन्सची बजावणी होऊन ते हजर झाले व त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १२/११/२०२४ रोजी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केलेआहे की, त्यांना दावेचे कामी आवश्यक असलेली कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाली नाहीत. तसेच, मुदतीत कैफियत दयावी लागते याचे त्यांना कायदेशिर ज्ञान नव्हते. त्यामुळे, प्रतिवादी यांना वादीचे दावेस कैफियत व म्हणणे मुदतीत सादर करता आले नाही. प्रत्यक्षात सदर कारणे व प्रतिवादी हजर झाल्याचा काळ विचारात घेतले असता, सदर कारणे संयुक्तीक वाटत नाहीत. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादी यांना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांना त्यांची कैफियत सादर करु देणे मला योग्य वाटते. वर नमुद प्रमाणे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला असल्याने प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.१,०००/- (रुपये एक हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2025.02.01 17:20:15 +0530

**( एस. ए. राठोड )**

गडहिंग्लज.
दिनांकः ०१/०२/२०२५.

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.